न्याय मिळवल्याशिवाय शांत बसणार नाही >> पान 2
अबब... डोणगाव ग्रामपंचायत वीजबिल तब्बल ६१ लाख ६४ हजार थकीत >> पान 3
जैविक कचरा प्रकरणी पोलिसांना आरोपीचा शोध लागेना >> पान 4

सुविचार
नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 207 ■ सोमवार, दि. 10 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



प्रीती झिंटाच्या हातांवर रितेशने किस करताच जिनिलिया भडकली?
आतील पान

# टीम इंडियाचा चॅम्पियन्स ट्रॉफीत किवींवर दमदार विजय

दुबई : टीम इंडिया विरूद्ध न्यूझीलंड चॅम्पियन्स ट्रॉफी) दुबईमध्ये ९ मार्च रोजी पार पडली. या अंतिम सामन्यात टीम इंडियाने किवींना पराभवाची धूळ चारली आहे. किवींनी नाणेफेकी जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्या इनिंगमध्ये किवींनी २५१ धावा करत २५२ धावांचे टीम इंडियाला आव्हान दिले. टीम इंडियाने अंतिम षटकापर्यंत झुंझ देत पाकिस्तान पुरस्कर्ते चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरत विजय संपादन केला. यामध्येविशेषकरून टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माची विजयी खेळी कौतुकास्पद आहे.

कर्णधार रोहित शर्माने या चॅम्पियन्स ट्रॉफीत एकही सामन्यात नाणेफेकी जिंकली नाही. मात्र टीम इंडिया रोहित शर्माच्या नेतृत्वात खेळत असताना त्याने प्रत्येक संघांना पराभवाची धूळ चारली. अंतिम सामन्यात न्यूझीलंडच्या फलंदाजीवेळी रचिन रवींद्र आणि विल यंग यांनी आपल्या संघासाठी एक चांगली सुरुवात करून दिली. अशातच रचिनला दोन वेळा जीवदान मिळाले. कुलदीप यादवच्या फिरकीने रचिन क्लिन बोल्ड बाद झाला. रचिनने २९ चेंडूत ३७ धावा केल्या, तर यंगने १५ धावा करत तंबूचा रस्ता गाठला. या दोन खेळाडूंच्या बाद होण्याने टीम इंडियाने खेळावर पकड निर्माण केली.







त्यानंतर केन विल्यम्सन १४ चेंडू खेळत ११ धावा करत कुलदीप यादवने त्याला बाद केले. डॅरेल मिचेल आणि टॉम लॅथन ही जोडी मैदानात आग ओकत फलंदाजी करत होती. त्यावेळी रवींद्र जडेजाने टॉम लॅथनला एलबीडब्ल्यू बाद केले. त्यानंतर फिलिप्सने चांगली कामगिरी करत ५२ चेंडूत ३४ धावा केल्या असून वरूण चक्रवर्तीने फिलिप्स स्वरूपात पाचवा गडी तंबूच्या आश्रयाला पाठवला.

तसेच किवींनी ४५ षटकात ५ गडी गमावून २०१ धावा केल्या. मायकल ब्रेसवेल २४ आणि डैरेल मिचेल ५३ धावांवर खेळत होते. त्यानंतर मोहम्मद शमीने निर्णायक क्षणी डॅरेल मिचेल याला बाद करत न्यूझीलंडला सहावा झटका दिला आहे. शमीने यासह वैयक्तिक पहिली विकेट मिळवली. डॅरेल मिचेल याने ६३ धावा करत किवींना सातवा धक्का बसला आहे. विराट कोहलीने जबरदस्त थ्रो करत त्याची विकेट काढली. अंतिम षटकापर्यंत किवींनी २५१ धावा करत टीम इंडियाला २५२ धावांचे आव्हान दिले.

टीम इंडियाची विजयी कामगिरी

टीम इंडियाचे सलमीवीर फलंदाज रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी चांगली कामगिरी केली. रोहित शर्माच्या कर्णधार खेळीचे कौतुक होत आहे. रोहित शर्माने सुरूवातीलाच चांगली खेळी करत ५८ वे अर्धशतक केले. किवीचा गोलंदाज फिलिप्सने अप्रतिम झेल घेत शुबमन गिलला मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. गिलने ५० चेंडू खेळत केवळ ३१ धावा केल्या आहेत. तर रणमशीन विराटला खास कामगिरी करता आली नाही. त्याने केवळ १ धाव करत तंबूचा आश्रय धरला, त्याला एलबीडब्लूय स्वरूपात बाद केले. त्यानंतर रोहित शर्माच्या रुपात टीम इंडियाला तिसरा धक्का बसला. रोहितने अर्धशतक करत ७६ धावांची झुंझार खेळी खेळली असून रचिन रवींद्रने त्याला बाद केले.

जडेजाचा विजयी चौकार

उर्वरित समीकरण हे ९१ चेंडू आणि ९० धावा असताना खेळपट्टीवर श्रेयश अय्यर आणि अक्षर पटेल खेळत होते. दरम्यान श्रेयश अय्यर झेलबाद स्वरूपात बाद झाला. श्रेयश अय्यरच्या स्वरूपात टीम इंडियालापाचवा धक्का बसला. त्यानंतरमोक्याच्या वेळी के. एल राहुल आणि हार्दिक पांड्याने संघाची कमान सांभाळली. यावेळी हार्दिकने मोठा फटका मारण्याच्या नादात हार्दिकप पांडया झेलबाद झाला. हार्दिक पांड्याने केवळ १५ चेंडू खेळत निर्णायक ११ धावा करत बाद झाला. पांड्यानंतर टीम इंडियाचा फलंदाज रविंद्र जडेजाने अंतिम षटकात विजयी चौकार लगावत चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरलं.

## क्रिकेट प्रेमींसाठी अवर्णनीय, अविस्मरणीय आनंदाची पर्वणी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आयसीसी चॅम्पियन्स चषकावर तब्बल १२ वर्षांनंतर भारताचे नाव कोरल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाचे अभिनंदन केले आहे. भारतीय संघाने सांघिक भावना आणि जिद्द, चिकाटीतून क्रिकेट प्रेमींसाठी अवर्णनीय, अविस्मरणीय आनंदाची पर्वणी आणली आहे, हे अभिमानास्पद आहे, असे कौतुकोद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्णधार रोहित शर्मा यांचे विशेष कौतुक केले आहे. या संपूर्ण मालिकेवर कर्णधार रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सुरवातीपासून वर्चस्व राखले आणि अंतिमतः विजयाचा कळस केला. यासाठी भारतीय संघ कौतुकास आणि अभिमानास पात्र आहे. क्रिकेट हे भारतीयांचे वेड आहे. पण केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील क्रिकेटप्रेमी भारतीय संघाचे चाहते आहेत. त्यांच्यासाठीही भारताच्या 'यंग अँड एनर्जेटीक' संघाची चिवट झुंज उत्कंठावर्धक ठरली. संघाने विजयश्री खेचून आणत क्रिकेट प्रेमींच्या आयुष्यात अवर्णनीय अशा क्षणांचे साक्षीदार होण्याची अविस्मरणीय पर्वणीच आणली. हा विजय नेत्रदीपक आणि क्रिकेट प्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा होता, त्यासाठी आपण सर्व क्रिकेट प्रेमी भारतीय संघाचे आभारी राहू, अशा भावना व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारतीय संघातील खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शक आदींचे अभिनंदन केले आहे.

# पतंजली प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल- मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 'पतंजली फुड व हर्बल पार्क'चे उद्घाटन

- या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल
- पतंजली व राज्य शासन या प्रकल्पात आधुनिक नर्सरी उभारेल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : पतंजली फुड व हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. या प्रकल्पास राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून पतंजली व राज्यशासन संयुक्तपणे सर्व सोयींनी सज्ज नर्सरी येथे उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**





सविस्तर वृत्त पान २ वर

## प्रत्येक भारतीयास क्रिकेट संघाचा अभिमान –उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतीय क्रिकेट संघाने आपल्या अप्रतिम खेळाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीवर नाव कोरले असून, संपूर्ण देशभरात या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष साजरा केला जात आहे. अंतिम सामन्यात न्यूझीलंडवर थरारक विजय मिळवत भारताने पुन्हा एकदा जागतिक क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या विजयाच्या ऐतिहासिक क्षणी उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी भारतीय संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री पवार यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे की, भारतीय संघाने दाखवलेली जिद्द, समन्वय, संघभावना आणि सर्वोच्च दर्जाचा खेळ प्रत्येक भारतीयाच्या मनाला आनंद देणारा आहे. अंतिम सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली चपळता, आत्मविश्र्वास आणि शेवटच्या क्षणापर्यंत दिलेली झुंज ही भारतीय क्रिकेटच्या लौकिकास साजेशी होती. संपूर्ण संघ, प्रशिक्षक मंडळ व सहयोगी सदस्यांचे तसेच खेळाडूंचा उत्साह वाढविणाऱ्या समस्त क्रिकेट रसिकांचे यासाठी विशेष अभिनंदन. हा विजय तरुण खेळाडूंसाठी प्रेरणादायी असून, भविष्यात भारतीय क्रिकेट विक्रमांचे आणि लोकप्रियतेचे नवे उच्चांक प्रस्थापित करेल, असा विश्र्वास आहे. भारतीय संघाने उंचावलेला हा विजयाचा झेंडा भविष्यातही असाच फडकत राहो, यासाठी संपूर्ण देश त्यांच्या पाठिशी आहे. संघाच्या या नेत्रदीपक विजयाने संपूर्ण देशाला अभिमान वाटतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री पवार यांनी आपला आनंद व्यक्त केला.

## गंगेचे पाणी कोण पिणार? राज ठाकरेंकडून कुंभमेळ्याची खिल्ली, नव्या वादाची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

**पिंपरी–चिंचवड/प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे मेळाव्यात केलेल्या वक्तव्यावरून नवा वाद होण्याची शक्यता आहे. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात अंधश्रद्धेवर भाष्य करताना थेट कुंभमेळ्यातील गंगा स्नानाची खिल्ली उडवली आहे. कुंभमेळ्यातील गंगेचं पाणी कोण पिणार? असा सवाल राज ठाकरे यांनी केला. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यावर राजकीय वादंग होण्याची शक्यता आहे.

मनसेचा आज १९ स्थापना दिन पक्षाच्यावतीने साजरा करण्यात येत आहे. पक्ष स्थापनेच्या तब्बल १९ वर्षानंतर राज ठाकरे पहिल्यांदाच पिंपरी चिंचवड मध्ये पक्षाच्या मेळाव्यासाठी दाखल झाले. यावेळी ज्येष्ठ अभ्यास डॉ. सदानंद मोरे यांनी महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांना संबोधित केले. राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांना संबोधित करताना विविध मुद्यांवर भाष्य केले.


सध्या राजकीय पक्ष हे राजकीय फेरीवाले झाले असल्याचे सांगत त्यांनी पक्ष फुटीवर सडकून टीका केली. राज यांनी म्हटले की, सगळे राजकीय फेरीवाले आले तसे आपण नाहीत. इकडंन डोळा मारला की इकडे तिकडं न डोळा मारला की तिकडे जातात. आपण असे फेरीवाले नाहीत आपण अख्खा दुकान उभे करू पण हे राजकीय फेरीवाले होणार नसल्याचेही राज ठाकरे यांनी म्हटले.

# समृद्धी महामार्गावर भाविकांच्या क्रुझरला भीषण अपघात; २ जण जागीच ठार व १३ जण जखमी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा** : भरधाव वेगाने जाणाजया क्रुझर जीपचा भीषण अपघात होऊन दोन जण जागीच ठार तर, १३ जण जखमी झाले.सदर अपघात समृद्धी महामार्गावरील सावरगाव ता. सिंदखेड राजा येथे सकाळी आठ वाजता दरम्यान मुंबई कॅरिडोर वर घडला.





प्राप्त माहितीनुसार ८ मार्च रोजी सकाळी यवतमाळ जिल्ह्यातील बाबूळगाव तालुक्यातील आसेगाव येथील भाविक क्रु झरने शिर्डी येथे साईबाबाच्या दर्शनासाठी जात असताना सिंदखेडराजा जवळील माळसावरगाव येथे समृद्धी महामार्गावर मुंबई कॅरिडोर चॉनल क्रमांक ३४४.७ जवळ एम.एच. २५ आर ३५७९ क्रमांकाच्या क्रुझरचे डाव्या साईडचे पाठीमागील टायर फुटल्याने भीषण अपघात होऊन क्रुझर समृद्धी महामार्गावर पलटी झाला.त्याच वेळी पाठीमागून येत असलेली एम.एच२९–सीबी ९६३० क्रमांकाच्या कार चालक हर्षल देवानंद भाग्यवंत वय २८ वर्ष रा. यवतमाळ यांना समोरील महामार्गावर पलटी झालेल्या क्रुझर चा अंदाज न आल्याने क्रुझरला पाठीमागून धडक दिली. या अपघातात विद्याबाई साबळे वय ५५ व मोतीराम बोरकर वय साठ वर्ष दोन्ही आसेगाव देवी तालुका बाबुळगाव जिल्हा यवतमाळ असे जागेवरच मरण पावले. तसेच तेरा जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस चे पीएसआय गजानन उज्जैनकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल मुकेश जाधव व स्थानिक पोलीस स्टेशन सिंदखेड राजाचे पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप डोंगरे, विष्णू नागरे तात्काळ धाव घेऊन किरकोळ जखमी यांना औषध उपचार कामी रावांना केले व क्यूआरव्ही टीम सिंदखेड राजाचे पवन काळे, खंडू चव्हाण,अभिषेक कांडेकर व महाराष्ट्र सुरक्षा बलचे मच्छिंद्र राठोड,अविनाश राठोड व अजय पाटील यांनी सर्व मृतक व जखमी यांना क्रुझर मधून बाहेर काढून अपघातग्रस्त वाहने महामार्गाच्या बाजुला करून व वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## सावित्रीबाई फुलेंचे कार्य भूषणावह

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा आज म्हणजे १० मार्च २०२५ रोजी १२८ वा स्मृतिदिन. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# न्याय मिळवल्याशिवाय शांत बसणार नाही

## धनंजय देशमुख यांची संतप्त प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**बारामती/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूरपणे हत्या केली आहे. आम्ही न्याय मागण्यासाठी आलो. आम्ही तुमच्या दारात आलो आहोत.आम्हाला न्याय द्या, असा टाहो धनंजय देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना फोडला. यावेळी धनंजय देशमुख म्हणाले की, तुम्ही बीड चे पालकत्व घेतले आहे. ज्यावेळी तुम्ही बीडला याल तेव्हा परिस्थिती जाणून घ्या. आमच्यावर विश्र्वास न ठेवता तुम्ही, कागदपत्रे पुरावे पाहा आणि न्याय द्या. घटनाक्रम कसा घडला तो जाणून घ्या. याला जबाबदार कोण? कोणी जबाबदारी घ्यायची ? आज माझा जन्मदिवस




होता. संतोष देशमुख यांनी जे गावासाठी केले त्याची एक एक आठवण होत होती. भावनिक हो म्हणावे लागत नाही, दु:खाचे गाठोडे खांद्यावर घेऊन आम्ही फिरत आहोत. न्याय मागत आहोत. ते मिळवल्याशिवाय शांत बसणार नाही,फरार आरोपीला कोणी पोसले, कोणी सांभाळ केला, कोणी फरार केले हे समोर आल्याशिवाय राहणार नाही. त्याला लवकरात लवकर अटक करून फाशीची शिक्षा द्या. जे काही करायचे ते यंत्रणेने करायला हवे.आमची ठोस भूमिका ही आहे की, या गुन्ह्यात कोणीही असला ज्याने काही हस्तांतरण केले आहे. जे आठ आरोपी आहेत. जे मकोका, खून, अपहरण याच्या गुन्ह्यात आहेत. यापैकी एकाच जर खून झाला असता तर धनंजय मुंडे यांची काय भूमिका राहिली असती, कसा न्याय मागितला असता तसाच आम्ही अजित दादांना बाबरंतीतून आवाहन करत न्याय मागत आहोत. आम्हाला या गोष्टीचा उलघडा करा की, हे आरोपी कोणाचे आहेत. कुठे राहत होते, कुठून तुमचा कारभार हाकत होते. हे सर्वांसमोर आहे ते एकदा जाणून घ्या, आमचा विचार करा, अशी तुम्हाला हात जोडून विनंती करतो. राजीनामा झाल्यावर त्यांनी वक्तव केल्याने त्यावर बोलण्याची इच्छा नाही.हेच वक्तव वारंवार बोलून पाठपुरावा केला असता तर विचार करण्या सारखं होत. उपमुख्यमंत्री अजित पवारांना बारामतीतून हात जोडून विनंती करत आहे की, आमच्या जिल्ह्यात जी अराजकता माजली आहे ती बाजुला करा. चुकीचे जे आहे ते बाजुला काढून टाका. तुम्हाला कोणीही साथ द्यायची सोडणार नाही. आम्हाला न्याय हवा असून न्याय मिळवल्याशिवाय शांत बसणार नाही.अशी प्रतिक्रिया संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख व मुलगी वैभवी देशमुख यांनी व्यक्त केली.

# बुलढाण्यातील राजूर घाट परिसरात बहरला पळस

## पळसाचे फुले वेधत आहे निसर्ग प्रेमींचे लक्ष



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** वसंत ऋतू लागताच जंगलामध्ये पळस फुले बहरतात आणि लाल केशरी रंगाने संपूर्ण वसुंधरा बहरून जाते. वसंत ऋतूत फुललेले हे पळसाचे झाड सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. रंगाची उधळण करणारा होळी सण जवळ आली की, हमखास आठवण होते ती पळसाच्या फुलांची. भर उन्हात सगळी सृष्टी ओसाड पडू लागली असताना रानावनात बहरणारी लाल केशरी पळसफुले वसुंधरेच सौंदर्य खुलवतात. लाल केशरी पळस फुले राजूर घाटात निसर्ग प्रेमींचे लक्ष वेधत आहे.

# प्रीती झिंटाच्या हातांवर रितेशने किस करताच जिनिलिया भडकली?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडमध्ये सेलिब्रिटींच्या हावभावांवरून वेगवेगळे अंदाज लावले जातात. कधी साध्या हसण्याला अर्थ लावला जातो, तर कधी एखाद्या क्षणिक प्रतिक्रियेवरून अफवा निर्माण होतात. असंच काहीसं घडलं होतं आयफा अवॉर्ड्स २०१९ मध्ये, जेव्हा अभिनेत्री जेनेलिया डिसूझा ही तिच्या पती रितेश देशमुख आणि अभिनेत्री प्रीती झिंटा यांच्यातील संभाषणादरम्यान अस्वस्थ दिसली. त्या क्षणाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला, आणि चाहत्यांनी लगेच अंदाज बांधला - जेनेलियाला हेवा वाटला का? ती नाराज होती का?



ही चर्चा इतकी वाढली की अखेर जेनेलियाने स्वतःच या गोष्टीचं स्पष्टीकरण दिलं. अरबाज खानच्या 'पिंच' या चॅट शोमध्ये ती म्हणाली, मी खूप दिवसांनी एखाद्या अवॉर्ड फंक्शनला जात होते. त्यामुळे सुंदर ड्रेस, उंच टाचांचे सँडल घालून तयार झाले होते. पण, लोकांना भेटणं, बोलणं यामध्ये माझ्या पायांचे प्रचंड दुखणे सुरू झाले होते. त्याच वेळी, रितेश आणि प्रीती झिंटा गप्पा मारत होते, आणि दुर्दैवाने कॅमेराने माझ्या चेहऱ्यावर आलेले एक्सप्रेशन्स टिपले.

यावर तिने पुढे मजेदार भाष्यही केलं. गेल्या वर्षी, जेनेलियाने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करत त्यावर Wanna know what happened back home? असं मजेशीर कॅप्शन दिलं. यावरूनच तिने या चर्चेचा हास्यस्पद पद्धतीने स्वीकार केला आणि अफवांना उत्तर दिलं.

जेनेलिया डिसूझाने लग्नानंतर चित्रपटसृष्टीतून काही काळासाठी ब्रेक घेतला. अनेकांनी तिला विचारलं की, तू अधिक काम का करत नाहीस? यावर तिने नुकत्याच एका मुलाखतीत सांगितलं, लोक काय बोलतात याला मी फारसं महत्त्व देत नाही. मला माझ्या मुलांसोबत वेळ घालवण्यात आनंद मिळतो. मी ठरवलं होतं की, माझ्या कुटुंबाला वेळ द्यायचा आणि मला अजूनही ते आवडतं.

# पतंजली प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




येथील मिहान परिसरात स्थित पतंजली फुड आणि हर्बल पार्कचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस बोलत होते. योगगुरु स्वामी रामदेव बाबा, पतंजली आयुर्वेद लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जलस्वाल, आमदार सर्वश्री डॉ. आशिष देशमुख, समीर मेघे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ९ वर्षांपूर्वी मिहानमध्ये पतंजलीने पाया रचला. त्यानंतर बऱ्याच अडचणी आल्या तरीही नडगमगता त्यांनी हा प्रकल्प पुर्णत्वास नेला. पतंजली उद्योग समुहाला नागपुरात मिहानमध्ये आमंत्रित केले त्याचवेळी विविध राज्यातून या समुहाला त्या-त्या राज्यांमध्ये उद्योग उभारण्यास बोलावण्यात येऊ लागले. मात्र मिहानमध्येच हा प्रकल्प उभारण्याचा संकल्प घेऊन व राज्यशासनाच्या रितसर निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन आज हा प्रकल्प उभा राहिला. या प्रकल्पासाठी आवश्यक माल संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून पुरविला जाईल. यामुळे शेतकऱ्यांचा मालही विकला जाईल. या प्रकल्पात संत्र्यावर प्रक्रिया केली जाईल. तसेच संत्रा साठवणुकीसाठी अत्याधुनिक शीतगृहेही येथे उपलब्ध आहेत. याचा फायदाही शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेंच या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्यावतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. याठिकाणी संत्र्यासाठी आवश्यक असणाऱ्या दर्जेदार कलमा तयार करण्याकरिता पतंजली आणि राज्यशासन संयुक्तपणे सर्व सुविधांनी युक्त आधुनिक नर्सरी उभारेल, असेही त्यांनी सांगितले.



## पतंजली प्रकल्पामुळे रोजगार व संत्र्याला बाजारपेठ- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

पतंजलीच्या मिहान स्थित फुड आणि हर्बल प्रकल्पासाठी दिवसाला जवळपास ८०० टन संत्र्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपसुकच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले. या प्रकल्पास शेतकऱ्याचे पूर्ण सहकार्य लाभेल व निंबुवर्गीय फळांचा पुरवठाही करण्यात येईल. या प्रकल्पाद्वारे शेतकरी समृद्ध होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. उत्तम संत्रा बीज आणि कलम निर्मितीसाठी आधुनिक नर्सरी उभारण्याची मागणी त्यांनी यावेळी राज्य शासनाकडे केली.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पतंजली फुड आणि हर्बल पार्कच्या कौनशिलेचे अनावरण आणि प्रकल्पाचे विधीवत उद्घाटन झाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन माहिती देणार - छगन भुजबळ



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** राज्यपालांच्या अभिभाषनाच्या वेळेस मी जे काही उदाहरण दिले होते, त्यामध्ये परभणीचे सोमनाथ सूर्यवंशी हे प्रकरण होतं. मारहाणी मध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे. कारवाई केली पाहिजे, माणसं माणसासारखीच असतात. मी आज त्यांच्या आईची भेट घेतली आहे. या प्रकरणामध्ये वेळोवेळी जी माहिती मिळेल ती माहिती मी घेणार आहे. घडलेल्या घटनेची माहिती मुख्यमंत्र्यांना देणार आहे, असं वक्तव्य छगन भुजबळ यांनी केले आहे.

### उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत लोकमान्य तर्फे महिलांचा गौरव




दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीतर्फे महित्ता दिनानिमित्त उन्नती २०२५ जल्लोष अभिजात मराठी भाषेचा या विशेष लोककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रत्नागिरीतील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना गौरवण्यात आले. लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी' आणि माध्यम प्रायोजक तरुण भारत संवाद यांच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जागतिक महिला दिनानिमित्त जायोजित या कार्यक्रमाचे उद्धाटन राज्याचे उद्योगमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत याच्या हस्ते झाले. यावेळी तरुण भारत संवादच्या संचालिका सई ठाकूर बिजलानी अतिरिक्त पोलीस अधीक्षक जपत्री गायकवाड, उपजिल्हाधिकारी शुभांगी साटे आणि उद्योजिका रेश्मा जोशी उपस्थित होते.

### संतोष देशमुख आणि सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ मूक मोचा




दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज सांगोला मध्ये मूक मोर्चा काढण्यात आला होता. संपूर्ण बहुजन समाजाच्या वतीने पक्ष आणि नेते विरहित हा मोर्चा काढला. आज रविवार हा सांगोला बाजारचा दिवस असूनही संपूर्ण सांगोला शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. महात्मा फुले चौक येथून खिशावर काळ्या फिती लावून हा मूक मोर्चा तहसील कार्यालय येथे निवेदन देऊन संपला. आजच्या बंद मुळे सांगोला मधील प्रसिद्ध जनावरांचा बाजारही बंद ठेवण्यात आला होता.

### अवैध गौण खनिज वाहतूक प्रकरणी कारवाई

**डोणगाव/प्रतिनिधी :** अवैध गौण खनिजाची वाहतूक प्रकरणी एका टिप्परवर ७ मार्च रोजी १२ वाजता मादणी फाट्याजवळ कारवाई करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार डोणगाव परिसरातील अवैध वाहतूक गौण खनिजाचे अवैध वाहतूक होत असल्याची माहिती महसूल विभागाच्या पथकला मिळाली. या माहितीवरून पदकाने ७ मार्च रोजी डोणगांव परिसरातील मादणी फाटा येथे जावेद खा भोले खा यांच्या मालकीचे एम. एच.२८ बी.बी. ४०१७ क्रमांकाचे टिप्पर अंदाजे २ ब्रास गौण खनिजाची अवैध वाहतूक करताना आढळून आले. यावेळी पावतीची पडताळणी केली असता त्यांच्याजवळ पावती मिळाली असून पाहतीमध्ये माहिती कोरी आढळून आली. त्यामध्ये खोडतोड आढळून आली. पुढील कारवाईसाठी डोणगाव पोलीस स्टेशन कडे सदर प्रकरण सुपूर्द करण्यात आले.



# अबब... डोणगाव ग्रामपंचायत वीजबिल तब्बल ६१ लाख ६४ हजार थकीत

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी :** वीज बिलांचे सर्वात मोठे थकबाकीदार म्हणून सतत शेतकऱ्यांच्या डोक्यावर खापर फोडण्यात येते. मात्र, महावितरणच्या सर्वांत मोठ्या थकबाकीदारांमध्ये डोणगाव येथील स्थानिक स्वराज्य संस्था कुठेही मागे नाही. डोणगाव ग्रामपंचायतकडे तब्बल ६१ लाख ६४ हजार ३५० रुपयाचे वीज बिल थकीत असल्याने हा आकडा सर्वांना चक्रावणारा आहे. एकीकडे विद्युत वितरण कंपनी देयक वसुलीसाठी ग्राहकांचे वीज पुरवठा खंडित करण्याचा सपाटा लावला आहे.तर, दुसरीकडे ग्रामपंचायत वीज देयक थकबाकीचा आकडा हा डोळे फिरवणारा आहे. एरवी ग्राहक व शेतकऱ्याचे देयक थकीत झाले. तर, त्यांना त्यांचा विद्युत पुरवठा खंडित करून त्यांना वेठीस धरले जाते.तर, दुसरीकडे ग्रामपंचायतीकडे तब्बल ६१ लाखाच्यावर वीज देयक झाल्यानंतरही विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी गप्प असल्याने आश्र्चर्य व्यक्त केल्या जात आहे. यातून विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी तेरे भी चूप मेरी भी चूप या प्रमाणे वागत असल्याचे दिसून येत आहे. वीज देयकाचे थकबाकीदार म्हणून शेतकऱ्यांवर नेहमी खापर फोडल्या जाते. शेतकऱ्यांना कमी दाबाचा विद्युत पुरवठा करून त्यांचे अडवणूक केल्या जाते. त्याचबरोबर कधी रात्री तर कधी दिवसा असा वीज पुरवठा करून शेतकऱ्यांना नेहमीच वेठीस धरल्या जाते. एकीकडे थकीत देयक वसूल करण्यासाठी विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी वसुलीचा दंडुका उगारत ग्राहकांचे वीज पुरवठा खंडित करीत आहे. ग्राहकाकडून देयक वसुलीसाठी मोहीम राबविली जात आहे. तर, दुसरीकडे ग्रामपंचायतकडे थोडेथिडके नव्हे तर, तब्बल ६१ लाखाच्यावर देयक बाकी असतानाही याबाबत विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी व ग्रामपंचायत गप्प असल्याने यामागील कारण काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.शेतकऱ्यांना रात्री वीज पुरवठा करायचा आणि ग्रामपंचायतकडे लाखोंची वसुली झाल्यानंतरही दुर्लक्ष करायचे या दुटप्पी धोरणाबद्दल विद्युत वितरण कंपनी प्रति बद्दल तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

### ग्रामपंचायत व महावितरणचे तेरी भी चूप मेरी भी चूप.




### ग्रामपंचायतचे पथदिवे दिवसाही सुरू

सर्वसामान्य ग्राहकांना सुरळीत विद्युत पुरवठा देण्यासाठी नेहमीच असमर्थ ठरलेली विद्युत वितरण कंपनी वीज बचत करण्यासाठी ग्रामीण भागातील लोडशेडिंग करून देय वीज बचत करण्याचा प्रयत्न करते. तर, सर्वसामान्य ग्राहकाकडून नियमित व शक्तीने देयक वसुली करते देयक भरण्यास विलंब झाल्यास विद्युत पुरवठा खंडित करण्याचा कारवाई करण्यात येते. तर, दुसरीकडे ग्रामपंचायत प्रशासनाकडे तब्बल लाखोंच्यावर देयक असतानाही सदर देयक वसुलीसाठी दुर्लक्ष केल्या जाते . वीज बचत करण्यासाठी लोड शूटिंग तर ग्रामपंचायतचे पथदिवे मात्र दिवसाही सुरू राहत असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाचा व विद्युत वितरण कंपनीचा समोर येत असल्याचे आला आहे. याबाबत मात्र, सर्वसामान्य विद्युत ग्राहकाकडून कंपनी प्रती रोष व्यक्त केला जात आहे.

## आमदार मनोज कायंदे यांच्या प्रेरणेतून गोर बंजारा एकदिवसीय लैंघी स्पर्धा उत्साहात संपन्न





दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** सिंदखेड राजा चे आमदार माननीय मनोज भाऊ कायंदे यांच्या प्रेरणेतून गोर बंजारा एकदिवसीय लैंघी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते स्पर्धेमध्ये आलेल्या टीमला भरघोस बक्षिसांचे वाटप करण्यात आले. जवळपास एक लाख ६१ हजार बक्षिसे वितरित करण्यात आली.

सिंदखेडराजा मतदार संघातील प्रतिष्ठित बंजारा समाज बांधवांकडून या कार्यक्रमांमध्ये बक्षिसाची रक्कम प्रदान करण्यात आली..

बंजारा समाजाची सांस्कृतिक धरोवर टिकून राहावे समाजाची बोलीभाषा परंपरा संस्कृती स्पर्धेच्या माध्यमातून ती जिवंत ठेवण्याचे प्रयत्न करण्यात आला. जवळपास ३० ते ३५ टीम ( स्पर्धकांनी ) या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी स्पर्धकांना बक्षिसाचे वितरण केले.

जिल्ह्यातून आणि बाहेरील जिल्ह्यातून अनेक टीमने भाग घेतला होता. श्याम भाऊ जाधव, प्रा.अरविंद चव्हाण, वितेश चव्हाण, प्रा. रमेश राठोड, डॉक्टर राठोड, लक्ष्मण राठोड, प्राचार्य दत्तात्रय चव्हाण, उमेश राठोड, छोटू पवार, इत्यादी असंख्य समाज बांधव उपस्थित होते

## देऊळगाव राजा येथे भाजपा ची बैठक संपन्न



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बारामती :** ९/०३/२०२५ रोजी देऊळगाव राजा येथे भारतीय जनता पार्टी सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाची, संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियान ,तसेच सक्रिय सदस्य नोंदणी आणि बुथ समिती गठन, या संदर्भात ही बैठक आयोजित करण्यात आली होती, या बैठकीला अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष डॉक्टर गणेश जी मान्टे हे उपस्थित होते, या बैठकीत सक्रिय सदस्य नोंदणी, बूथ समिती गठन, व सक्रिय सदस्य ऑफलाइन नोंदणी या संदर्भात व वेळेवर येणारे काही महत्त्वाचे विषय या संदर्भात या बैठकीमध्ये जिल्हाध्यक्ष मा.डॉ गणेशजी मांन्टे यांनी मार्गदर्शन केले तसेच आपण सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने भारतीय जनता पार्टीच्या ,बूथ समिती गठन करण्याच्या कामामध्ये आपला सहभाग द्यावा असे आवाहन यावेळी मार्गदर्शनपर भाषणात जिल्हा अध्यक्ष मा.डॉ गणेशजी मान्टे यांनी केले. या बैठकीला अनुसूचित जाती मोर्चाचे ,प्राध्यापक यादवराव भालेराव सर महाराष्ट्र प्रदेशचे ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉक्टर सुनील कायंदे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महामंत्री प्रा.गजानन घुले ,सिंदखेडराजा विधानसभेचे संयोजक ,आनंद देशमुख सिंदखेड राजा मंडळाचे तालुकाध्यक्ष आत्माराम शेळके देऊळगाव राजा मंडळाचे अध्यक्ष संजय मुंडे युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष संतोष डोईफोडे देऊळगाव राजाचे शहराध्यक्ष संजयजी तिडके राजेशजी भुतडा डॉक्टर शंकर तलबे ,कृष्णा काळे, एकनाथ काकड ,सिंदखेडराजा विधानसभेचे विस्तारक श्रीराम मुंडे, पंचायत राजचे जिल्हाध्यक्ष ,विठोबा मुंडे निशिकांत भावसार, प्रमोद सानप, सदस्य, गजानन खांडेभराड, प्राध्यापक दिलीप चव्हाण, गबाजी कुटे ,अंकुर भाऊ देशपांडे ,संदीप बुंदे, महिला मोर्चाच्या, सविता ताई पाटील, महिला मोर्चाच्या पावले मॅडम, दिनेश वाकोड,जिल्हा उपाध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा, भारत कांबळे,अनिल काकडे, पप्पू मुंडे, श्रीरामजी बर्डे ,सुधाकर गीते,देवानंद सानप, शिवा भाऊ वाघ,संतोष पवार रमेश टेटवार,सदाशिव पडघान,राहुल लव्हाळे गजानन वायाळ गबाजी ढाकणे, श्रीकृष्ण तौर,गजानन परिहार,ओमराजे जाधव, संचित धनावत, सुरज निकाळजे, गणेश जावळे,श्रीराम भाऊ बिन्नी वाले, डॉक्टर राम धोंगडे मधुकर जायभाये, गजानन घुगे,संजय गुरुकुल ,विष्णू जायभाये, रामनाथ केकान आदी मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीचे शक्ति केंद्रप्रमुख ,पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैभवी देशमुख सोबत संपूर्ण महाराष्ट्र आहेः अंबादास दानवे

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** वैभवी देशमुख सारखी चिमुकली आपल्या वडिलांच्या मुत्यू विरोधात आवाज उठविला आहे. एवढं होऊनही सरकार आरोपींना वाचवण्यासाठी प्रयत्न करते,हे दुर्देवी आहे. वैभवी देशमुख सोबत संपूर्ण महाराष्ट्र आहे.अशी प्रतिक्रिया विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. यावेळी ते म्हणाले की, निर्धार शिबिरामध्ये बरं पेक्षा खरं बोललं पाहिजे, वास्तव समोर आलं पाहिजे, जुन्या नव्याची सांगड घातली पाहिजे, समन्वय आवश्यक जनतेत पोहोचले पाहिजे, भिती कोणाची नाही, निडरतेने काम केले पाहिजे, निवडणूक येतील जातील असे ते म्हणाले. कुंभमेळा संपला आहे. त्यामुळे त्यावर बोलणे योग्य नाही, जे गेले त्यांच्या भावनांचा आदर करायला हवा.केंद्राने गंगा, यमुना स्वच्छता मोहीम घेतली आहे.मोदी साहेबांनी नदी साफ करण्याची मोहीम राबवलेली होती. दिल्ली इलेक्शन मध्ये तुम्ही बघितले यमुनेची काय स्थिती झाली आहे. नदीला आपण आईसमान मानतो आणि भाजप कोट्यवधी रुपये खर्च करते पण कोणतीच नदी स्वच्छ होत नाही.अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी केली.

## पुण्यात तरुणाचे रस्त्यावरील अश्लील कृत्य ; गौरव आहुजाला 1 दिवसाची पोलीस कोठडी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे येथील रस्त्यावरील तरुणाने अश्लील कृत्य केल्या प्रकरणी गौरव आहुजाला १ दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुणे येथील रस्त्यावर गौरव अहुजा याने अश्र्लिल कृत्य करून फरार झाला होता. तर तो कराडमध्ये सरेंडर झाला. त्यानंतर आज त्याला न्यायालयासमोर हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर, त्याच्या मित्राला देखील रात्री अटक करण्यात आली होती. पुणे शहरातील येरवडा येथे मद्यधुंद अवस्थेमध्ये रस्त्याच्या मध्यभागी कार उभी करून लघुशंका करून त्याने



जाब विचारणाऱ्या एका व्यक्तीसोबत हुज्जत घातली होती. अश्र्लील चाळे करणाऱ्या तरुणांना पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यानंतर आज दोन्ही आरोपींना कोर्टासमोर हजर करण्यात आले असता गौरव अहुजाला सात दिवसांची पोलीस कोठडी द्या, अशी मागणी पोलिसांनी केली होती. मात्र, न्यायालयाने त्यांना केवळ एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. कोर्टात या दोन्ही तरूणांच्या वकीलांनी जोरदार युक्तीवाद केला. भाग्येश ओसवाल याचे वकील पुष्कर दुर्गे यांनी युक्तीवाद करताना म्हणाले की, एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली. एक व्यक्ती गाडीतून खाली उतरली, पण अशिल गाडीत बसला होता. ओसवाल गाडीतून खाली उतरला नाही, ओसवाल गाडी सुद्धा चालवत नव्हता. भाग्येश ओसवाल स्वत: पोलिसात हजर झाला आहे. भाग्येश ओसवाल याचा या गुन्ह्याशी काय संबंध आहे? फक्त गाडीत शेजारी बसला म्हणून त्याच्यावर कलम लावला गेला. भाग्येश ओसवाल याचा जामीन अर्ज दाखल करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर, या प्रकरणातील मुख्य आरोपी गौरव आहुजाच्या वकिल सुरेंद्र आपुणे यांनी युक्तीवाद करताना म्हटले की, नोटीस द्यायची नाही, मिडिया आणि राजकीय दबावाखाली या सगळ्या गोष्टी पोलिसांनी केल्या आहेत. सरळपणे सेक्शन ६५ लावले गेले. जो पर्यंत केमिकल रिपोर्ट येत नाही, तोपर्यंत कलम ६५ लागू शकत नाही. पोलिसांनी असे कुठलंही द्रव्य जप्त केले नाही. गाडी गुन्ह्यात वापरली नाही, जस्टीफिकेशन पोलिसांकडून दिसून येत नाही, आरोपी पळून गेलेला नाही, तो स्वत: कराड पोलिसांकडे हजर झाला आहे, असा युक्तीवाद गौरव आहुजा याच्या वकीलांनी केला.

# जैविक कचरा प्रकरणी पोलिसांना आरोपीचा शोध लागेना



**दीड महिन्याच्यावर कालावधी : तरीही तपास गुलदस्त्यात**

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : वैद्यकीय जैविक कचरा पर्यावरण व माणव, प्राणी जीवनासाठी घातक असल्याने त्याची विल्हेवाट लावण्याचे कडक नियम आहेत. मात्र, सर्व नियमांना बगल देत अज्ञात व्यक्तींनी २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळच वैद्यकीय जैविक कचरा जाळल्याची घटना घडली. त्यानंतर डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी यांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना पत्र देऊन सदर प्रकरणाची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी केली.**

मात्र, तब्बल महिन्याच्यावर कालावधी झाला असतानाही पोलीस प्रशासनाला अद्याप जैविक कचरा जाळणाऱ्याचा शोध लागला नसल्याने आश्र्चर्य व्यक्त केला जात आहे. डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा जाळला होता. यामध्ये सलाइन, बॉटल, सिरिन्ज, इंजेक्शन, व्हाईल, सोनोग्राफी रिपोर्ट, रक्ताने माखलेले कपडे, आधार कार्ड झेरॉक्स व अन्य साहित्य होते. या कचऱ्याला आग लावल्यानंतर अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बलकार, मेहकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वप्निल चव्हाण, डॉ. राठोड, डॉ. राम गायकवाड यांनी पाहणी करून पंचनामा केला.

तसेच शहरातील बारा हॉस्पिटलच्या हॉस्पिटलची तपासणी केली असून या तपासणी अहवालात अनेक तपासणीमध्ये अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर, पोलीस प्रशासनाकडून तब्बल महिना दीड महिन्याच्या वर कालावधी होत असतानाही सदर प्रकरणाची साधी चौकशीही करण्यात आली नसल्याची बाब समोर आली आहे. यावरून पोलीस प्रशासन किती गांभीर्याने तपास करतात. याबाबत चर्चेला पेव फुटले आहे. डोणगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे




वैद्यकीय अधिकारी यांनी पत्र दिल्यानंतर यांनी डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना पत्र दिल्यानंतरही या प्रकरणाची दखल न घेता याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

एखाद्या घटनेत आरोपीकडे याप्रमाणे दुर्लक्ष केले जाईल की, काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पत्राची दखल पोलीस अधिकाऱ्यांनी घेतली नसल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन तपास करणार की नाही असा प्रश्न निर्माण होत आहे. पोलीस प्रशासनाच्या या दुर्लक्षितपणामुळे त्यांच्या कार्याप्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.







# नैसर्गिक पद्धतीने रोज ८०० टन ज्यूस तयार करून मिळणार : बाबा रामदेव

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** ८०० टन रोजची क्षमता आहे, यात कुठले ब्रिजरेविटी नसणार नैसर्गिक पद्धतीने ज्यूस तयार करून मिळणार आहे. शेतकरी यांना समृद्ध मिळणार आहे. आज संत्र्याचे उत्पादन वाढवण्यासाठी चांगल्या पद्धतीचे रोप तयार करण्यासाठी नर्सरी तयार करू. अन्य पद्धतीचे जे फळ आहे. त्यांचाही नैसर्गिक पद्धतीने ज्यूस काढण्याचा काम करू. संत्रा निर्यात करण्यासाठी सुद्धा प्रयत्न करू. विदर्भाला लागून गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान लगतच्या राज्यातून संत्रा आणण्यासाठी जाऊ, जय जवान, जय किसान, जय मिहान हे महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण करू असे मत पतंजलीचे बाबा रामदेव यांनी व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, ट्रम्प यांनी टॅरिफ टेररिझम नवीन कीर्तिमान रचला आहे. लोकतंत्राची मर्यादा पायदळी तुडवली आहे.वर्ल्ड बँक, कोणालाच



ऐकत नसून, डॉलरची किंमत वाढवली, गरीब विकसनशील देशाचा पैशाची किंमत कमी करून एक प्रकाराने आर्थिक आतंकवाद डोनाल्ड ट्रम्प चालवत आहेत. भारताला विकसनशील बनवले पाहिजे. काही देश जगाला विनाशाकडे नेण्याचे काम शक्तिशाली देश करत आहे. युरोप, अमेरिका, ब्रिटन या पद्धतीने सनातन धर्मांवर निशाणा साधला जात आहे. मजबी आतंकवाद पचावला जात आहे, हे दुदैर्वी आहे. यासाठी सर्व देशांने यावर उपाय शोधला पाहिजे, यासाठी पुढाकार भारताने घेतला पाहिजे, औरंगजेब हा भारताचा आदर्श नाही तो औरंगजेबाचा खानदान हे लुटेरे यांचे खानदान होते. बाबर असो की त्याचं कुटुंब असो ते भारताला लुटाण्यासाठी आले होते. हजारो महिलांवर अत्याचार केला हे लोक आपले आदर्श होऊ शकत नाही.आमचे आदर्श छत्रपती शिवाजी महाराज आहेत.असे मत यावेळी बाबा रामदेव यांनी व्यक्त केले.

# धुळ्यातील टोल नाक्यावर गांजासह दोघे पोलिसांच्या ताब्यात



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** मोहाडी पोलीस ठाणे अंतर्गत असलेला लळिंग टोल नाक्याजवळ पोलिसांकडून नाकाबंदी करत ये-जा करणाऱ्या मोटर सायकलची तपासणी केली जात होती. या नाकाबंदी दरम्यान एक विना नंबर प्लेटची दुचाकी धारकाला पोलिसांनी थांबण्यास सांगितले व त्याच्याजवळ असलेल्या गोणीमध्ये काय आहे असे विचारताच त्याने उडवाउडवीची उत्तर दिली. मात्र, पोलिसांनी गोणी उघडण्यास सांगितल्यावर यामध्ये मोठ्या प्रमाणात गांजा हा पोलिसांना आढळून आला. सदर नाकाबंदी दरम्यान मोहाडी पोलिसांनी लाखो गांजा जप्त केला असून, जयराम पावरा रा. शिरपूर व नाशऱ्या पावरा रा. मध्य प्रदेश येथील दोघांना पुढील कारवाई करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शशिकांत शिंदे यांनी यावेळी दिली.

# राजकीय सुडबद्धीतून डॉ. ज्ञानेश्वर टालेंवर तडीपारची कारवाई

## शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचा आरोप : तडीपरीला लोकसभा निवडणुकीचा रंग असल्याची चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** क्रांतिकारी संघटनेचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांच्यावर तडीपारीची कारवाई ही राजकीय सुडबद्धीतून करण्यात आली आहे. या तडीपरीला लोकसभा निवडणुकीचा रंग आहे. असा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी केला आहे. जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्र्वर टाले यांच्यावरील तडीपारीच्या कारवाईने जिल्ह्यातील राजकीय वातावरण मात्र, चांगलेच तापत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्र्वर टाले यांच्याविरुद्ध मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार बुलढाणा जिल्हा व लगतच्या जिल्ह्यातून एक वर्ष कालावधीकरिता तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच तडीपारीची कारवाई केलेल्या डॉ. ज्ञानेश्वर टाले यांना बुलढाणा



जिल्हा व लगतच्या जिल्हे वगळता ज्या ठिकाणी वास्तव्यास राहतील, त्याठिकाणी स्थानिक पोलीस स्टेशनला दर पंधरा दिवसाला एक दिवस तरी हजेरी देणे बंधनकारक राहील. असा आदेश ४ मार्च २०२५ रोजी मेहकर उपविभागीय दंडाधिकारी यांनी दिला आहे.




मात्र, सदर तडीपरीच्या कारवाईवरून जिल्ह्यातील राजकारण मात्र हे चांगलेच गरम होत असल्याचे चित्र आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्या मंत्रीपदाचा गैरवापर करून पोलिसांवर दबाव आणून जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांच्यावर राजकीय सुडबुद्धीतून कारवाई केली असल्याचा आरोप केला आहे.तर, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मात्र, या संदर्भात माझा कोणताही संबंध नसल्याचे जाहीर केले आहे. यावरून जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच गरमागरम होत असल्याचे चित्र आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले हे गत बारा वर्षापासून रविकांत तुपकर यांचे सक्रिय कार्यकर्ते आहेत.

काही महिन्यापूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीतही डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी रविकांत तुपकर यांची साथ दिली आहे. निवडणुकीत भूमिका राजकीय पकड निर्माण केल्याने भविष्यात आपल्या राजकारणाला धोका निर्माण होऊ शकतो याची भनक लागली असल्याचा कारणावरून ज्ञानेश्र्वर टाले यांच्यावर कारवाई केली असल्याचा आरोप केला जात आहे. ज्ञानेश्र्वर टाले यांच्या तडीपार कारवाई ने मात्र, जिल्ह्यातील राजकारण गरमागरम झाले आहे.



डॉ. ज्ञानेश्वर टाले यांच्यावर कारवाईने लोकसभेचा बदला: रविकांत तुपकर क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष असलेले डॉ. ज्ञानेश्वर टाले हे खुप ताकतीचे कार्यकर्ते आहेत. मागील एक तपापेक्षा अधिक काळापासून ते माझ्यासोबत आहेत. चळवळीत काम करताना त्यांनी शेतकर्यांच्या प्रश्नावर सतत आंदोलने केली आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मेहकर विधानसभा क्षेत्राची माझ्या प्रचाराची सर्व जवाबदारी त्यांनी सांभाळली. शेतकरी अन् तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मला प्रतापराव जाधव यांच्या तोडीस तोड मते मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला. याचाच राग केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना आहे. लोकसभेला विरोधात काम केले म्हणून जाधव यांनी पोलिस प्रशासनाच्या खांद्यावर बंदुक ठेवून डॉ. टाले यांच्यावर तडीपारीची कारवाई केली. त्यांना बुलढाणा जिल्ह्यातून हद्दपार केले असून बाजूच्या जिल्हयात येण्यास बंदी घातली आहे. माध्यमांशी बोलण्यासही त्यांना परवानगी नाही. एवढ्या खालच्या पातळीवर येऊन सुडबुध्दीचे राजकारण प्रतापराव जाधव यांच्या सारख्या नेत्याला शोभत नाही, असे सांगत ज्ञानेश्वर टाले सारख्या सच्चा शेतकरी नेत्यावरील कारवाईच्या विरोधात रान पेटवणार असल्याचा इशारा रविकांत तुपकर यांनी दिला आहे...